# संजीवन इंग्लिश मीडियम स्कूल, रंकाळा.

प्रिय पालक, दिनांक :- २३/१२/२२

सुंदर दिवसाच्या सुंदर शुभेच्छा !!!

आपणास कळविण्यात आनंद होतो की आपला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा दिनांक २४ डिसेंबर २०२२, शनिवार रोजी ठीक ५:१५ वाजता आयोजित करण्यात आलेला आहे

१) वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा हा स्किट, गाणी, नृत्य अशा विविध प्रकारांचा चार ते पाच तासांचा कार्यक्रम असल्यामुळे ठीक ५:०० वाजता सुरू होणार आहे तरी आपल्या पाल्याला ४:१५ वाजता तयार करून शिक्षकांकडे शाळेमध्ये सुपूर्त करावयाचे आहे. कार्यक्रम प्री प्रायमरी ते नववीपर्यंतचा असल्यामुळे वेळेवर पाल्य पाठवला तरच नृत्याच्या क्रमाने मुले तयार ठेवता येतील. त्यामुळे पालकांनी दिलेल्या वेळेचे पालन करावयाचे आहे

२) शिक्षकांनी दिलेल्या सूचनेनुसार मुलांचा मेकअप, हेअर स्टाईल पालकांनी करून पाठवावा. शाळेमध्ये फक्त टचअप केले जाईल.

३) डान्स साठी जी ज्वेलरी वापरली जाईल ती व्यवस्थित असावी, सोन्याची नसावी.

४) आपण सर्व मुलांना रेंट वर ड्रेस देत असल्यामुळे तो त्याच दिवशी परत देणार आहोत तरी पाल्यासोबत त्याचा ज्यादाचा ड्रेस व कॅरीबॅग पाठवायची आहे.

~~५) प्री प्रायमरी मुलांना डायपर घालून पाठवावे. तसेच सोबत एक ज्यादाचा डायपर~~ पाठवावा.

६)) एका आमंत्रणपत्रिकेवर चार व्यक्ती येण्याची परवानगी आहे. कार्यक्रमाला येत असताना सर्व व्यक्ती एकत्र आल्या नाहीत तर त्याची नोंद गेटवरच करावी व जेव्हा त्या व्यक्ती गेटवर येतील त्यावेळी तुम्ही स्वतः आमंत्रण पत्रिका घेऊन गेटवर जाणे अनिवार्य आहे.

७)पार्किंगची जागा कमी असल्यामुळे शक्यतो पालकांनी टू व्हीलर आणावी .फोर व्हीलर पार्किंग बाहेर असल्यामुळे त्याची जबाबदारी सर्वतोपरी पालकांची असेल. पार्किंग करत असताना वाहतुकीस अडथळा होईल अशा प्रकारे पार्किंग करू नये याची दक्षता घ्यावी.

८) पालकांना विनंती आहे की पुरेसा खाऊचा डबा मुलांसोबतच द्यावा नंतर स्वीकारला जाणार नाही. कुठल्याही प्रकारचा बाहेरचा खाऊ आत मध्ये दिला जाणार नाही.

९) एकदा गेट बंद झाले की उघडले जाणार नाही. आपल्या स्कूलच्या आवारांतच खाण्याचे स्टॉल उपलब्ध असल्यामुळे कुणालाही बाहेर पाठवले जाणार नाही.

१०) विद्यार्थी शिक्षकांच्या सवयीचे असल्यामुळे विद्यार्थ्यांची काळजी शिक्षक घेत असतात आपल्या पाल्यासाठी सारखे तो कसा आहे ही विचारपूस करू नये.

११)प्ले ग्रुप ते दुसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अर्धा कार्यक्रम पार पडल्यानंतर पाठविण्यात येणार आहे. त्यांचा डान्स ड्रेस बदलल्यानंतर शाळेच्या परिसरात मुलांना आणण्यात येईल व तशी सूचना पालकांना देण्यात येईल मगच पालकांनी आपल्या पाल्याला घेण्यासाठी शाळेच्या आवारात यायचे आहे.

आपल्या पाल्याचा डान्स झाला म्हणून लगेच त्याला घेण्यासाठी स्टेजच्या पाठीमागे गर्दी करू नये.

Scanned with CamScanner

१२) प्रत्येक डान्स चा फोटो फोटोग्राफर काढणार आहेत त्यामुळे डान्स सुरू झाल्यानंतर कुणीही फोटो काढण्यासाठी किंवा व्हिडिओ करण्यासाठी स्टेज जवळ गर्दी करू नये किंवा जागेवर उभे राहू नये. त्याचबरोबर तुम्हाला सुट्टीनंतर फोटोचा इंडेक्स दाखवण्यात येईल व त्यानुसार योग्य दर आकारून फोटो दिले जातील. डान्स व्हिडिओ ची लिंक पालकांना पाठवण्यात येईल.

१३) पालकांना महत्त्वाची सूचना आहे की चार व्यक्ती व्यतिरिक्त जर लहान मुले असतील तर मुलांना मांडीवर घ्यावे.

१४) कोणत्याही कारणास्तव शिक्षकांशी वाद घालू नये सर्वांनी सामंजस्य बाळगावे ही विनंती.

१५) सर्व पालकांना एक विनंती आहे की ,आपल्या पाल्याचा डान्स झाल्यानंतर लगेच घरी जाण्यास गडबड करू नये आपल्या सर्व पाल्यांचा हा कार्यक्रम आहे. कार्यक्रम चांगल्या रीतीने पार पाडण्यासाठी आपण सहकार्य केले तरच कार्यक्रम विनाअडथळा उत्तम दर्जाचा होईल व पार पडेल तरी सर्वांनी कार्यक्रम संपेपर्यंत थांबून सहकार्य करावे.

१६)गेले दीड महिने सर्व विद्यार्थी, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी वार्षिक स्नेहसंमेलन सुरळीत पार पडावे यासाठी कष्ट घेत आहेत.पालकांना एक कळकळीची विनंती आहे की त्यांनी वॉचमन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी इतर व्यक्ती यांच्याशी कोणत्याही प्रकारचा वाद घालू नये.

आपल्या पाल्याबरोबरच इतर मुलांचे कौतुक करण्यासाठी तुम्ही थांबणं अपेक्षित आहे. तरीही सदर कार्यक्रमात कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्या ठिकाणी वाद न घालता तुमच्या काही शंका ,समस्या, तक्रारी असल्यास त्या सुट्टीनंतर येऊन मॅनेजमेंटशी भेटून त्या मांडू शकता.

| Roll No | Name of the student | Contact no | Sign |
|---|---|---|---|

Scanned with CamScanner